**दिनांक: ०१ - ११ - २०२३**

**विषय: पत्रकार नगर पुनर्निर्माण प्रक्रियेत सोसायटी आणि बिल्डर यांच्यात समजुती च्या करार नाम्या वर (Memorandum of Understanding) झालेल्या सह्यांच्या बाबत.**

पत्रकार नगरच्या सर्व बंधु भगिनींनो काल दिनांक ३१/१०/२३ रोजी आपण आपल्या संस्थे च्या पुनर्निर्माण प्रकल्पात अजून एक महत्वाचा टप्पा गाठला. काल एका छोटे खानी समारंभात आपले ७ पंच समिती सदस्य आणि बिल्डरचे अधिकृत प्रतिनिधी यांच्यात Memorandum of Understanding मसुद्यावर, आपले प्रकल्प सल्लागार श्री हर्षल कवडिकर, विधी सल्लागार एड. किरण काबरा आणि दोन साक्षीदार श्री सतीश आळेकर तसेच श्री सुरेशचंद्र पाध्ये, यांच्या उपस्थितीत सह्या झाल्या.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थचे चे अध्यक्ष श्री विजय सावंत होते.

ह्यात पंच समिती कडून श्री विजय सावंत, श्रीमती अरुंधती भिडे, श्री प्रदीप नेवाळकर, श्री अनंत शाळिग्राम, श्री विजय लेले, श्री अनंत बेदरकर आणि श्री राजाराम जोशी यांनी तर विकसका तर्फे ह्या प्रकल्पा साठी स्थापित न्याती शुभम निर्माण डव्हलपर्स LLP चे तीन डायरेक्टर्स श्री संदीप माहेश्वरी, श्री प्रणव न्याती आणि श्री विनय बडेरा ह्यांनी तसेच साक्षीदार म्हणून आपले श्री सतीश आळेकर आणि श्री सुरेशचंद्र पाध्ये यांनी सह्या केल्या.

आपले तीन पंच समिती सदस्य ह्या कार्यक्रमास उपस्थित नव्हते. सचिव श्री विनायक पटवर्धन परदेशी आहेत,  श्रीमती ऋता बावडेकर ह्या परिक्षेत व्यस्त आहेत तर श्री सुवर्णकांत ठाकोर काही व्यक्तिगत कारणाने येऊ शकले नाहीत. त्यांनी तशी आगाऊ सूचना पंच समिती ला दिली होती.

सही झालेल्या ह्या Memorandum of Understanding मधे, दिनांक २१/१०/२३ रोजी झालेल्या सभासदांच्या मेळाव्यात, सभासदांनी दिलेल्या सर्व व्यवहार्य आणि योग्य सूचनांचा, ज्या आपण विकसकाला दिलेल्या Letter of Intent तसेच विकसकाने १६/६/२३ रोजी दिलेल्या Offer च्या चौकटीत बसत होत्या, समावेश करण्यात आला आहे.

ह्या बद्दल चा पूर्ण खुलासा दिनांक २९/१०/२३ रोजी आयोजित सभासदांच्या मेळाव्यात करण्यात आला होता . त्यात असे ही स्पष्ट करण्यात आले होते कि काही सूचनां चा विचार Development Agreement stage वर करण्यात येऊ शकतो MOU stage वर नाही.

इथे हे ही लक्षात घेण्या सारखे आहे की विकसकाच्या वरील नमूद Offer ला आपण मोठ्या बहुमताने ने, दिनांक २५/६/२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मान्यता दिली आहे.

काल सह्या झालेल्या ह्या Memorandum of Understanding चा मसूदा Notarized करण्यात आला आहे तसेच तो सभासदांच्या माहिती साठी आपल्या वेब साईट वर ही उपलब्ध आहे.

विकसकांतर्फे श्री माहेश्वरी आणि श्री न्याती यांनी हा मोठा प्रकल्प ज्या विश्वासाने सोसायटी ने त्यांना दिला आहे तो विश्वास ते पूर्ण पणे सार्थ ठरविण्याची ग्वाही दिली.
सर्वांच्या उपस्थिती करिता आणि वरील कार्यक्रम यशस्वी करण्या करिता अध्यक्ष श्री सावंत यांनी सर्वांचे आभार मानून तसेच सर्वांनी मिळून पुनर्निर्माण प्रकल्पा ला गती देण्या चे आवाहन करून समारंभ संपल्या चे जाहीर केले.

# पंच समिती